# मराठी शेजाऱ्यांच्या शोधात..

विद्या हर्डीकर सप्रे, कॅलिफोर्निया

मागे प्रसिध्द झालेल्या लेखात उत्तररंग वसाहतीची निवड करण्यासाठी आम्ही काय केले ते लिहिले होते. त्याचा सारांश म्हणजे आम्ही उत्तररंगाच्या अवस्था, त्यानुसार गरजा पुरवणाऱ्या वसाहतींचे प्रकार आणि आपली जीवनपध्दती( लाईफस्टाईल) कशी असायला हवी त्याचा विचार केला त्यानुसार वसाहतीची निवड कशी केली ते सांगितले. आम्ही ***पंचावन प्लस अथवा*** "ॲक्टिव्ह ॲडल्ट कम्युनिटी" ही आमच्यासाठी सध्या योग्य असा विचार का केला ते सांगितले आणि अशी वसाहत निवडण्याचे आमचे निकष सांगितले. आमच्या मुली, भाच्या अमेरिकेत विविध राज्यात विखुरलेल्या. तेव्हा एक मोठा निर्णयात्मक घोट आम्ही सर्वात प्रथम घेतला ! तो म्हणजे, रहात्या घरापासून फार दूर जायचे नाही ! याचा अर्थ मुलीं पासून आणि भाच्यांपासून आम्ही विमानाच्या अंतरावर असणार! त्याचे परिणाम आम्ही मुलांबरोबर चर्चा करून सर्वांना समजावले. आम्ही मग कॅलिफोर्नियातच अशा वसाहती पहाण्याचा सपाटा चालवला. निकषांनुसार कोष्टके बनवून तुलना सुरू केली. जवळच्या तीन गावातल्या "फोर सीझन्स" नावाच्या वसाहती आम्ही पाहिल्या. पाम स्प्रिंग्ज, हेमेट आणि ब्युमॉंट येथे त्या आहेत. "आम्ही यापैकी एका वसाहतीत रहाणार आहोत, कोण कोण येणार ?" असे आवाहन करून आम्ही द. कॅलिफोर्नियातल्या मराठी लोकांची अर्ध्या

दिवसाची परिषद घेतली. आता अगदी आकडेवारीसकट माहिती ताटात वाढल्यावर "तुम्ही ते वसाहतीचं काम केव्हा करणार" असा प्रश्न करणारे निरुत्तर झाले. "हो, हो, आपल्याला काहीतरी करायला पाहिजे" म्हणणारे, प्रत्यक्ष निर्णयाची वेळ आली तेव्हा घुटमळू लागले. हे अपेक्षित होतं. कारण "आता उडी घ्या" म्हटलं की आपले पाय उचलत नाहीत. त्यासाठीच तर निकष आणि कोष्टके यांच्या प्रक्रियेतून ( म्हणजे प्रॉसेस) मधून आपण स्वतः जावे लागते ! आता यातली एक निवडण्याची वेळ आली तेव्हा आमचेही पाय थोडे लटपटले. आम्हाला पाम स्प्रिंगची वसाहत सर्वात पसंत. कारण आमच्या जवळ जवळ सर्व निकषांच्या कसोटीत क्रमांक एक ! पण !! पण एका निकषावर मोठ्ठा "पण" होता! उन्हाळा! पामस्प्रिंग चा उन्हाळा आमच्या रहात्या गावापेक्षा तीस डिग्रीने जास्त! तेव्हा मग आणखी कोठे जावे अशी चलबिचल ! मनात एक गाव होते ! त्याचे नाव टमेक्युला. हा टुमदार प्रदेश.. वाइनरीचं गाव. लॉस एन्जेलिस भागातला " ट्रॅफिक जॅम" नाही.. शिवाय या रिव्हरसाइड काउंटीत घरांच्या किंमती खाली आदळलेल्या.. लोमालिंडासारखे उत्तम हॉस्पिटलची शाखा होते आहे.. सॅंडियागो पासून फार दूर नाही.. मनात आणलं तर पाम स्प्रिंगच्या चित्रपट महोत्सवाला जाण्यास जवळ !.. आता लॉस एन्जेलिसचा आंतरराष्ट्रीय विमानतळ चाळीस ऐव जी ऐंशी मैल दूर जाणार.. पण ओंटारियोचा विमानतळ आहे जवळ ! मग आम्ही टमेक्युलातली घरे पाहू लागलो. फोर सीझन्स सारखी वसाहत नाही तर नाही..अशी मनाची तयारी होत असतांनाच, रस्त्यावर पाटी दिसली, "फोर सीझन्स" ! पोस्टाचा पत्ता मरिएटा या गावाचा असल्याने हे आमच्या गूगलने दाखवलं नव्हत. आम्हीही पामस्प्रिंगच्या फोर सीझन्सवाल्यांना फोन करून विचारलं नव्हतं.. पुढचं सगळं सोपं होतं. आम्ही आलो इथे रहायला. आल्यावर आमच्या कोष्टकात अगदी खालच्या नंबरावर असलेले निकषही मिळाले.. म्हणजे चालण्याच्या अंतरावर सर्व दुकाने, बॅंक, व गॅस स्टेशन. पाच मैलाच्या परिसरात मोठ्ठा शॉपिंग मॉल, वाइनरीज, उत्तम उपहारगृहे, हो आणि अगदी भारतीय दुकानही ! पूर्वी आमचे ८ मैलांवर रहाणारे मित्र गाठायला ट्रॅफिकमुळे ४० मिनिटे लागत. आता ( तेही सॅंडियागोजवळ रहायला गेले असल्यामुळे) ४५ मिनिटात आम्ही त्यांच्याकडे !

लॉस एन्जेलिस परिसरातले सर्व कार्यक्रम आणि मित्र तसे फाऽर लांब नाहीत. ३० मैलांऐवजी ६० मैलांवर.. एकदा मनाची तयारी केली आणि घातली गाडी हायवेवर की मेल्या कोंबडयाला आगीचं काय भय हो !

गेली दोन वर्षे आम्ही येथे मजेत आहोत. ५०० घरे आहेत, आठ एकराचे क्लब हाऊस, तिथे सर्व प्रकारच्या गोष्टी.. कला, खेळ, गप्पा टप्पा, दर रविवारी चित्रपट, मोठा पोहोण्याचा तलाव, योगा, ताय ची असे वर्ग, मोठे सभागृह आणि फक्त १५० डॉ. दर महा होम ॲसोशिएशन फी मध्ये सर्व फुकट ! आमच्या काही कार्यक्रमासाठी मोठया स्वयंपाकघरासकट सभागृह भाडयाने मिळते, ते केवळ २५०डॉ. भाडयात, दिवसभरासाठी ! विवाह समारंभाला तर इतके देखणे ठिकाण नाही ! आमचे शेजारी अमेरिकन. बरेचसे निवृत्त त्यामुळे काव्य शास्त्र विनोदास रिकामे.. आम्ही कुलूप लावून दोन तीन महिने गावाला जातो, तर आमच्या घराची आणि बागेची काळजी घेतात.. आमच्याघरी आमचे आठ दहा पाहुणे एकदा येणार होते (हे बरीक त्यांना नवलाइ चे ) ती वार्ता ऐकून माझी शेजारीण दारात टॉवेल्सचा गठ्ठा घेऊन उभी राहिली, म्हणाली, " अग, तुला लागतील ना ? आणि हो, माझ्या फ्रिजमध्ये चिकन कॅसारोल आहे, हवा का तुला ? " तेव्हा तिच्या संवेदनाशीलतेने माझ्या डोळ्यात पाणीच आले. जाता येता डोकावणाऱ्या प्रेमळ शेजारणी, आठवडयातून एकदा तरी एकत्र जमून होणारी आमची जेवणे, पुस्तकांची आणि पाकक्रियांची देवाणघेवाण, आमच्या घरी होणारे सूर्यनमस्कार आसनांचे वर्ग, एकत्र चालायला जातांना मी त्यांना सांगितलेल्या

**लक्ष्मीबाई टिळकांच्या नि आनंदीबाई जोशींच्या गोष्टी .. थोडक्यात आम्ही खूप मजेत आहोत. आमचे जुने मराठी, भारतीय मित्र येत असतात. आमचे लमाल(लॉस एन्जेलिस मराठी लेखक)चे कार्यक्रमही मजेत होतात. त्यासाठी शंभर मैल येण्याची आमच्या मित्रांची तयारी असते. पण तरीही गडयांनो, एक कमतरता आहे. आम्हाला अजून कोणी मराठी शेजारी नाही. ( २५ जमले तर आमच्या रविवारच्या सिनेमात बच्चनचा नाहीतर राजा गोसावीचा सिनेमा दाखवण्याचे अॅसोशिएशनने कबूल केले आहे.) आमचे फिलाडेल्फियाचे काही मित्र येऊन एकदोन घरे पाहूनही गेले. 'कॅलिफोर्नियातील घर आपल्याला परवडत नाही' असे त्यांना वाटे, येथील घरांच्या किंमती पाहून ते खोटे आहे तेही त्यांना पटले आहे. तेव्हा तुम्हीही विचार करा. आमच्या घरी या, दोन दिवस राहून अनुभव घ्या आणि करा बेत घर घेण्याचा. हे घर तुमच्या कोणत्याही अन्य घरासारखे केव्हाही विकता येते.**

आपल्याला मोकळया वेळाचा आनंद आपल्यासारख्या समवयस्क मित्रांबरोबर घ्यायचा आहे ? आपली तब्येत सांभाळून आपले शारीरिक आणि मानसिक आरोग्य चांगले टिकवण्यासाठी काही करायचे आहे.? मनात आले की घराला कुलूप लावून प्रवासाला, नातवंडांकडे, मित्रांकडे जायची सोय हवी आहे ? साधे, सुटसुटीत, मोकळे हव. एक मजली घर हवे? उत्तम रुग्णालय जवळ हवे ना ? हवा छान हवी. बर्फ काढायला नको. फार उकाडा नको. हो ना ? फार मोठं घर नको, पण अगदी अपाटर्मेंटम ध्ये रहाण्याची तयारी नाही बुवा आपली. तेव्हा आटोपशीर दोन तीन खोल्यांचं पण घर हवं. पुढे मागे लहान अंगण हवं.हो ना? हे सगळं परवडणाऱ्या किंमतीत हवं. आता हप्ते नको भरायला असंच तुमच्या मनात आहे ना? मग करा विचार. आम्ही तुमच्या सारखे चांगले शेजारी शोधत आहोत. सगळा आनंद घ्यायचा तर अशा वसाहतीत येण्यासाठी ८० वर्षापर्यंत थांबण्याची गरज नाही. दोघांपैकी एकाचे वय पंच्चावनच्या वर असले म्हणजे झाले. उलट लहान वयात आल्यामुळे आम्हाला या वसाहतीचा जास्तीत जास्त फायदा घेता येतो.

**अधिक माहितीसाठी पुढील संकेतस्थलावर जाः**

**http://www.55places.com/california/communities/four-seasons-at-murrieta**

**http://4seasonsmurrieta.com/**

----------------------------------------------------विद्या हर्डीकर सप्रे, कॅलिफोर्निया.